बुलढाणा जिल्हा पोलीस दलातील चालक भरती २०२१

शुद्धीपत्रक नमुना

दिनांक ३०.११.२०१९ रोजी पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक / समादेशक राज्य राखीव पोलीस बल (घटक प्रमुखांनी त्यांचे घटकाचे नांव नमुद करावे.) यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक (गट-क) व सशस्त्र पोलीस शिपाई ची पदे भरण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक, महापरीक्षा पोर्टल यांचेमार्फत स्पर्धात्मक परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. ह्या जाहिरातीत स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार संबंधित पोलीस घटक प्रमुखांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल असे स्पष्ट करण्यात आले होते. त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे :-

१. मुद्दा क्रमांक ५:- 'ऑनलाईन परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या' ऐवजी 'ऑफलाईन OMR based परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या' असे वाचावे.

२. मुद्दा क्रमांक ११.१३ आणि १३.३ मध्ये 'उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परीक्षा केंद्राकरिता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायापैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमून देण्यात येईल' हे. शब्द वगळण्यात येत असून त्या ऐवजी **'उमेदवाराच्या परीक्षा प्रवेशपत्रावर नमुद केलेल्या लेखी परीक्षा केंद्रावर नमुद दिनांकास उमेदवाराने लेखी परीक्षेसाठी हजर राहणे बंधनकारक आहे.'**

३. सदरील जाहिरातीत जेथे जेथे 'ऑनलाईन परीक्षा' असे नमुद केले आहे त्या सर्व ठिकाणी 'ऑफलाईन परीक्षा' असे वाचावे.

४. मुद्दा क्रमांक ८ :- महाराष्ट्र शासन-निर्णय क्रमांक राआधो ४०३९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ३१/०५/२०२१ अन्वये एसईबीसी हे आरक्षण रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे शासन निर्णय दि. ३१.०५.२०२१ व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०२०/प्र.क्र. ३२०/१६-ब, दि. ५.७.२०२१ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार एसईबीसी या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागा अराखीव (खुल्या) प्रवर्गात समाविष्ठ करण्यात याव्यात. सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता दिलेले आरक्षण रद्द झाल्यामुळे ज्या उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरिता निश्चित केलेल्या आरक्षणांतर्गत आवेदनपत्र भरले होते, त्यांच्याकरिता पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

(i) मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल पिटिशन क्र.३१२३/२०२० प्रकरणी दिनांक ५ मे २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार एसईबीसी उमेदवारांचा अराखीव व ईडब्ल्यूएस प्रवगार्तून विचारात करण्यात यावा व असे करतांना एसईबीसीच्या ज्या उमेदवारांनी अराखीव प्रवर्गाकरिता विहित करण्यात आलेली वयोमर्यादा ओलांडली असेल त्यांच्याबाबतीत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे मागासवर्गीयांना देय असलेल्या वयोमर्यादा व परीक्षा शुल्काची सवलत कायम ठेवण्यात यावी.

(ii)मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल पिटिशन क्र.३१२३/२०२० मध्ये दि.५ मे, २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार भरती प्रक्रिया राबविण्याबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २०२०/प्र.क्र.३२०/१६-ब, दिनांक ५.७.२०२१ मधील परिच्छेद क्र. ७ मधील तरतुदींनुसार एसईबीसी वर्गाकरीता राखीव असलेली पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरीत करुन व एसईबीसी प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांकडून **'अराखीव'** अथवा **'आर्थिक दृष्टया मागास'** प्रवर्गाचा विकल्प घेऊन पूर्व परीक्षेचे आयोजन करावे असे नमुद आहे.

(iii) उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन ज्या उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरिता निश्चित केलेल्या आरक्षणांतर्गत आवेदनपत्र भरले होते अशा उमेदवारांना शासनाच्या धोरणानुसार आर्थिक दुर्बल घटक (EWS) आरक्षणाचा लाभ अथवा अराखीव (खुला) यापैकी एक विकल्प निवडावा.

(iv) जे उमेदवार आर्थिक दुर्बल घटक (EWS) आरक्षणाचा लाभ घेण्यास इच्छुक / पात्र असतील तर त्यांनी संकेतस्थळावर जाऊन (EWS) विकल्प निवडावा.

(v) ४(iv) वगळता EWS न निवडलेल्या उमेदवारांनी संकेतस्थळावर जाऊन अराखीव (खुला) ह्यावर क्लिक करुन अराखीव (खुला) पदाचा विकल्प निवडावा.

(vi) एसईबीसी या प्रवर्गातील जे उमेदवार आर्थिक दुर्बल घटक हा विकल्प निवडतील त्या उमेदवारांनी शारिरीक चाचणीच्या वेळी आर्थिक दुर्बल घटकाबाबतचे प्रमाणपत्र सोबत आणावे. जे उमेदवार प्रमाणपत्र सादर करणार नाहीत, त्यांना पुढील भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. तसेच त्यांना त्यावेळी प्रवर्गही बदलता येणार नाही.

(vii) सामाजिक व शैक्षणिक मागासप्रवर्गातील उमेदवारांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आरक्षण अथवा अराखीव (खुला प्रवर्ग) विकल्पाबाबतच्या ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ०६.७.२०२१ मधील तरतूदींनुसार खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. निवड प्रक्रियांमध्ये एसईबीसी उमेदवारांनी अर्ज केलेल्या ज्या जाहिरातीमध्ये ईडब्ल्यूएस आरक्षण लागू आहे, अशा निवडप्रक्रियांमध्ये एसईबीसी उमेदवारांना ईडब्ल्यूएस आरक्षण अनुज्ञेय करताना,सन २०१८-१९ व सन २०१९-२० मधील परीक्षांसाठी मार्च २०२० पर्यंत ग्राह्य असणारे ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. ज्या एसईबीसी महिला उमेदवार अराखीव (खुला) असा विकल्प देतील अशा महिला उमेदवारांनी संबंधित पदाची / परीक्षेची जाहिरात (दोन किंवा अधिक टप्प्याची परीक्षा असल्यास पूर्व परीक्षेची) प्रसिध्द झालेला आहे, त्या जाहिरातीनुसार एसईबीसी आरक्षणासाठी प्राप्त केलेले नॉन क्रिमिलेअर (NCL) प्रमाणपत्र हे अराखीव महिला पदासाठी ग्राह्य धरण्यात यावे.

(viii) आर्थिक दुर्बल घटक (EWS) व अराखीव (खुल्या) चा विकल्प घेण्यासाठी पोलीस महासंचालक यांच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर पोलीस कॉर्नर या बटनवर क्लिक केल्यानंतर पोलीस भरती-२०१९ वर क्लिक करावे. त्यानंतर Web link वर क्लिक करुन उमेदवारांनी ज्या घटकासाठी आवेदनपत्र सादर करण्यात केलेले आहे त्या घटकासाठी URL देण्यात आलेला आहे, त्यावर क्लिक करावे व सूचनाप्रमाणे कार्यवाही करावी.

(ix) **विशेष सूचना :- प्रत्येक उमेदवारांनी वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर जाऊन त्यांनी ज्या घटकांतर्गत आवेदनपत्र सादर केलेले आहेत त्या घटकांतर्गत निवड करुन उमेदवारांनी स्वतःचा Password बदल करुन घ्यावा.**

(x) एसईबीसी प्रवगार्तून अर्ज केलेल्या उमेदवारांना **'अराखीव'** अथवा, **'आर्थिक दृष्ट्या मागास'** प्रवर्गाचा विकल्प निवडण्याची सुविधा हे शुध्दीपत्रक प्रसिध्द झाल्यापासुन म्हणजेच दि. ५.०८.२०२१ पासून ते दिनांक १५.०८.२०२१ रोजी २४.०० वा. पर्यंत उपलब्ध राहील.

पोलीस अधिक्षक,
बुलडाणा.